महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
वाणिज्य विभाग, प्रकाशगड - ५ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई -५१
फोन: (वै) २६४७२६४५ (का) २६४७४२११: फॅक्स २६४७८५४४

**क्र.मु.अ(वा)/लेखा/ग्रा.प.दिवाबत्ती/५५/२००७-०८/५६९ दिनांक- ०७/०१/२००८**

**परिपत्रक क्र.७३**

**विषय:** - ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बीलांची रक्कम देण्यासाठी सन २००७-०८ च्या आर्थिक वर्षासाठी दिलेल्या अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. ३७.१३ कोटी (रुपये सदतीस कोठी तेरा लाख फक्त).

**संदर्भ**: - १) शासन निर्णय क्र.बीजीटी २६०७/प्र.क्र.४३०१/परा-४(२२) मंत्रालय, मुंबई -३२ दि. ३० नोव्हेंबर २००७.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. **मु.अ(वा)/लेखा/ग्रा.प.दिवाबत्ती/५५/२००७-०८/३१४१६ दि. ०४.०८.२००७.**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची देयके भागविण्यासाठी शासन १०० टक्के अनुदान देते. सन २००७-०८ च्या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये ११६,०६,७०,००/- (रु. एकशे सोळा कोठी सहा लक्ष सत्तर हजार फक्त) इतकी तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे, पैकी रक्कम रु. ५८,०३,००,०००/- (रु. अठ्ठावन कोटी तीन लाख फक्त) वरील संदर्भिय क्र. २ नुसार आपल्या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. तसेच आता रु. ३७,१३,००,०००/- (रु. सदतीस कोटी तेरा लाख फक्त) शासन निर्णय क्र.बीजीटी २६०७/प्र.क्र.४३०१/परा-४(२२) दिनांक ३० नोव्हेंबर २००७, सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून पुस्तकी समायोजनेद्वारे म.रा.वि.वि.कं.मर्यादितला रक्कम प्राप्त झाली आहे.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हानिहाय विवरण पत्रातील रक्कमेचे,संबंधित जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधीतानी जरुर ती कार्यवाही करावी.

क्षेत्रीय कार्यालयाने कळविल्यानुसार चालु वीज बिलापोटी (२००७-०८) एकुण रुपये ९५.१६ कोटीचा मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला होता तदवत पुस्तकी समायोजनेव्दारे शासनाकडून रुपये ९५.१६ कोटी कंपनीस प्राप्त झालें आहेत म्हणजेच उपरोक्त प्राप्त रक्कम ग्रामपंचायत दिवाबत्ती पोटी समायोजित केल्यास दि. ३१.३.२००८ अखेर थकबाकी राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक ३१.३.२००८ अखेर थकबाकी राहत असल्यास अथवा शासनाकडून प्राप्त रक्कम कमी अथवा जास्त राहत असल्यास संबंधित बाबीच्या खुलाश्यासह या कार्यालयास कळविण्यात यावे, व त्यानुसार सन २००८-०९ चा सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज या कार्यालयास त्वरित सादर करावा.**

थकबाकीपोटी समायोजित करण्यात आलेल्या रकमेचे, (सन २००७-०८) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरीत पाठवावी.

**सहपत्र: - वरीलप्रमाणे**

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर,**

१.संचालक (वित्त),म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित,मुंबई

**प्रत सस्नेह रवाना**

१. सर्व मुख्य अभियंता म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालय. माहिती व उचित कार्यवाहीसाठी

२.मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा),म.रा.वि.वि.कंपनी मर्या.मुंबई.

**प्रत रवाना**

१.सर्व अधिक्षक अभियंता,संवसुं मंडळ कार्यालये,म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित,

२.सह मुख्य लेखाधिकारी (अर्थोपाय विभाग) मुंबई

३.सर्व कार्यकारी अभियंता,संवसु विभागीय कार्यालये,म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित

४.सर्व उपकार्यकारी अभियंते/सहाय्यक अभियंते संवसु उपविभागीय कार्यालये,

----- उचीत कार्यवाहीसाठी.